अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग यांचे कार्यालय,
९१, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई — ४०००३०.
दुरध्वनी क्र. २४९२१२१२ (विस्ता),
Email- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दिनांक :— २२.०६.२०२२

# प्रेसनोट

यातील फिर्यादी यांच्या तक्रारीवर कारवाई करण्याकरीता रु. १ लाखांची मागणी करुन तडजोडीअंती रु. ८० हजारांची लाच स्विकारतांना पकडण्यात आले म्हणून गुन्हा नोंद.

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | बृहन्मुंबई विभाग. |
| गुन्हा नोंद क्रमांक | ३०/२०२२ |
| कलम | कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपी लोकसेवक | संतोष उध्दव जैताळकर, ३५ वर्षे, धंदा-नोकरी (पद जलमापक, पर्यवेक्षक) जलकामे विभाग, एस वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, कांजुरमार्ग (पुर्व), मुंबई-४०००४२. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. १,००,०००/- |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रु. ८०,०००/- |
| थोडक्यात हकीगत | यातील फिर्यादी रहात असलेल्या परिसरातील एका व्यक्तीच्या अनधिकृत बांधकामामुळे पावसाळयात फिर्यादी यांच्या घरात पाणी भरत असते. त्यामुळे सदर व्यक्तीवर कारवाई करण्याकरीता फिर्यादी यांनी मा. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे कार्यालयात तक्रार अर्ज केला होता. सदरचा अर्ज यातील लोकसेवक संतोष जैताळकर, जलमाफक पर्यवेक्षक, जलकामे विभाग, एस वॉर्ड, बीएमसी यांचेकडे चौकशीकरीता प्रलंबित होता. सदर अर्जाचे चौकशीकरीता फिर्यादी हे वेळोवेळी लोकसेवक यांचे वरील कार्यालयात गेले असता, नमुद लोकसेवक यांनी फिर्यादी यांचे तक्रार अर्जावर कारवाई करण्याकरीता रु. १,००,०००/- लाचेची मागणी केली.<br><br>फिर्यादी यांना नमुद लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक २०/०६/२०२२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे समक्ष हजर राहून लोकसेवक यांचे विरोधात लेखी तक्रार दिली.<br><br>प्राप्त तक्रारीनुसार दिनांक २०/०६/२०२२ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक यांनी फिर्यादी यांचेकडे रु. १,००,०००/- लाचेची मागणी करुन तडजोडीअंती रु. ८०,०००/- लाचेची मागणी करुन स्विकारण्याची तयारी दर्शविली.<br><br>दिनांक २१/०६/२०२२ रोजी करण्यात आलेल्या सापळापूर्व/सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक यांना फिर्यादी यांचेकडुन रु. ८०,०००/- लाचेची रक्कम स्विकारतांना पकडण्यात आले. म्हणून नमुद लोकसेवक त्यांच्याविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे. |

सहाय्यक पोलीस आयुक्त लाचलुचपत प्रतिबंधक विभाग

२२/०६/२२
( संजय पाटील )
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन),
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.
टोल फ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८
वेबसाईट :- acbmaharashtra.gov.in,
ईमेल :- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in,
ईमेल :- acbwebmail@mahapolice.gov.in
फेसबुक :- www.facebook.com - Maharashtra ACB
मोबाईलॲप :- www.acbmaharashtra.net

Scanned with CamScanner